महाराष्ट्र विधानपरिषद
**पत्रक भाग दोन**
**शुक्रवार, दिनांक २९ जून, २०१८/ आषाढ ८,१९४० (शके)**

८९. **अशासकीय ठरावांचे प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी बॅलट**

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी अशासकीय कामकाज (ठराव) घेण्यात येणार आहे. या दिवसांकरिता स्वीकृत अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम **ठरविण्यासाठी मंगळवार, दिनांक ३ जुलै, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता श्री.उमेश शिंदे, अवर सचिव यांच्या दालनात (कक्ष क्रमांक १६, पहिला मजला, विधान भवन, नागपूर) येथे बॅलट घेण्यात येईल.**

**मा.सभापतींनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ रोजी म.वि.प. नियम ५६ अन्वये दिलेल्या निदेश क्रमांक १९ नुसार संगणकीय आज्ञावलीव्दारे हे बॅलट घेण्यात येईल.**

सदरहू बॅलटसाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या सदस्यांनी कृपया वर नमूद ठिकाणी व वेळेवर उपस्थित रहावे.

**विधान भवन,**
नागपूर.
दिनांक : २९ जून, २०१८

**डॉ.अनंत कळसे,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती व मा. उप सभापती, विधानपरिषद यांचे सचिव तथा खाजगी सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, शिबीर कार्यालय, नागपूर.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष (website)
८) एम.के.सी.एल.कक्ष